## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Sanshodhak (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | संशोधक (print only) |
| **Publication Language** | English , Marathi |
| **Publisher** | Itihasacharya V. K. Rajwade Sanshodhan Mandal |
| **ISSN** | 2394-5990 |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Arts and Humanities (all) |
| **Focus Subject** | History , Literature and Literary Theory |
| **UGC-CARE coverage years** | from April-2021 to Present |

**Copyright © 2023 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer**

Scanned with CamScanner

UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

[illegible] पुरवणी विशेषांक



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

Scanned with CamScanner



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विद्यमान पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| • मा. श्री. मदनलाल मिश्रा | अध्यक्ष |
| • श्री. आनंद राजवाडे | प्रमुख मार्गदर्शक |
| • मा. दलूभाऊ जैन | उपाध्यक्ष |
| • श्री. संजय मुंदडा | कार्याध्यक्ष |
| • श्री. लखनजी भतवाल | कार्योपाध्यक्ष |
| • श्री. प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे | मुख्य चिटणीस |
| • श्री. व्यंकटेश दाबके | खजिनदार |
| • श्री. प्रा. सुनिल मुंदडा | वस्तु संग्रहालय चिटणीस |
| • प्रा.डॉ. सौ. मृदुला वर्मा | संशोधक त्रैमासिक चिटणीस |
| • श्रीमती जयश्री शहा | ग्रंथालय चिटणीस |
| • प्रा.डॉ. सौ. उज्वला नेहते | संशोधन व प्रकल्प चिटणीस |
| • प्राचार्या डॉ. सुनंदा अहिरे | संशोधन अधिकारी |
| • सौ. लता आगीवाल | कार्यकारी सदस्य |
| • प्रा.श्री.श्रीपाद नांदेडकर | क्युरेटर (पदसिद्ध) |

Scanned with CamScanner

ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४३ ● वर्ष : ९० ● अंक : ६

**संपादक मंडळ**

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर
**सहसंपादक** : डॉ.अर्जुन नेरकर व डॉ.संजय खैरनार; डॉ.राजेंद्र त्रिभुवन.

❊ प्रकाशक ❊

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-

वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना** : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळवणी** : अनिल साठ्ये, बावधन, पुणे 21.

**मुखपृष्ठावरील चित्र :**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका

१ ग्रामीण जीवन-व्यवहाराचे बदलते स्वरूप
- डॉ.गजानन भामरे, निमगाव, ता.मालेगाव ------- ०१

२ ग्रामीण साहित्यातील सामाजिकता
- श्री. वर्षा अहिरे/डॉ.सपना सोनवणे, मालेगाव - १५

३ दलित आत्मकथनातील समाज चित्रण
- प्रा.डी. ए. पाटील, शिरपूर, ता.धुळे ------- २०

४ डॉ.अ.वा.वर्टी यांच्या कथेतील ग्रामजीवनातून फुलणारा विनोद
- डॉ. अरूण पाटील, मालेगाव, जि.नाशिक ---------- २६

५ दलित कथाकार अण्णाभाऊ साठे
- डॉ.अर्जुन नेरकर, मालेगाव, जि.नाशिक------- ३१

६ दलित जाणीव चित्रण करणारी 'झूल' एक अभ्यास
- डॉ.सोमनाथ पावडे, सुरगणा, जि.नाशिक -------- ३७

७ दलित साहित्यातील सामाजिकता
- डॉ. वैशाली पाटील, चाळीसगाव ------------- ४४

८ दलित साहित्यातील वेगळेपण
- डॉ.सौ.मिनाक्षी पाटील, मालेगाव, जि.नाशिक --- ५३

९ आंबेडकरी चळवळीचे शिलेदार वामनराव गरूड
- डॉ. स्वप्नील गरुड, देवळा, जि.नाशिक --------- ५८

१० ग्रामीण साहित्याची चळवळ
- डॉ. किरण पिंगळे ---------------------- ६७

११ साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री समाजजीवन
- डॉ.सुरेखा जाधव, निफाड, जि.नाशिक ------- ७५



Scanned with CamScanner

१२ ग्रामीण कविता

- प्रा. केशव गावीत, नामपूर ---------------- ८३

१३ अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील सामाजिकता

- प्रा. एस. टी. खैरनार, मार्गदर्शक डॉ.उज्ज्वला देवरे --- ९०

१४ महात्मा फुले यांच्या साहित्यातील सामाजिकता

- डॉ.मिलिंद देवरे, म्हसदी, ता.साक्री, जि.धुळे. ----- ९४

१५ दलित स्त्री आत्मकथनांतून व्यक्त होणारे समाजजीवन

- डॉ.हिरालाल पाटील, शहादा, जि.नंदुरबार ------- १००

१६ मराठी ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता

- डॉ.नामदेव माळी, धुळे -------------- १०८

१७ ग्रामीण कवितेतील सामाजिकता

- प्रा. सुनिल जाधव, नामपूर, ता.बागलाण. ------- ११६

१८ नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण कवितेतील समाजजीवन

- प्रा. संतोष कन्नोर, मार्गदर्शक डॉ.उज्ज्वला देवरे ---- १२३

१९ Marginalisation of Women in Shashi Deshpande's That Long Silence

- Prof.Bharatchandra Shewale, Nimgaon - १२८

२० Godless World of the Small Things: A Study of Katherine Mansfield's Short Story, The Doll's House

- Dr.Prakash Wankhede, Malegaon, Nasik -- १३५

२१ Maya Angelou: A Voice for Marginalized

- Prof.Rajnikant Sonar, Shirpur, Dhule ----- १४९

२२ Contribution of Sudha Murthy to uplift the Tribal, the most Neglected Marginalized: A Select Study of her Stories

- Prof.Sandip C. Kurkute, Satana, Nasik ---- १५६



Scanned with CamScanner

ISSN No 2394-5990

# नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण कवितेतील समाजदर्शन

– प्रा. संतोष कन्नोर, मालेगाव, जि.नाशिक
मार्गदर्शक : डॉ. उज्ज्वला देवरे

**प्रास्ताविक :**

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण जीवनातील प्रश्न तीव्र होत असले तरी हे प्रश्न काही आजच निर्माण झालेले नाहीत. त्यालाही शंभर वर्षांची परंपरा आहे. इंग्रजांचे व्यापारी वसाहतिक राज्य येथे आले आणि भारतातल्या – विशेषतः ग्रामीण भारतातल्या प्रश्नांना प्रारंभ झाला. इंग्रज या ठिकाणी आले, ते काही या देशाच्या उद्धारासाठी नाही. त्यांना येथे व्यापार करावयाचा होता. शोषण करावयाचे होते, आणि राज्यही करावयाचे होते. त्याप्रमाणे सारे घडलेही. एक एक संस्थान खालसा होत गेले, नामधारी होत गेले आणि क्रमाने संस्थानांचे सैन्य कमी होत गेले. शेतीवरचा बोजा वाढत गेला. शेतीतून उत्पन्न होणारा माल इंग्रज स्वस्त घेऊन त्याचा पक्का माल करीत आणि पुन्हा महाग विकीत. एका प्रकारे दुहेरी शोषण होऊ लागले. युरोपात यंत्रयुग अवतरल्याचा फटका भारतासारख्या अविकसित देशांना मोठ्या प्रमाणात बसला. भारतालाही बसला. इंग्रजी राजवटीचा एक महत्वाचा परिणाम असा दिसू लागला की, खेड्यातील स्वयंरोजगार क्रमाने धोक्यात आले. मँचेस्टरचा कापड येऊ लागला आणि भारतातील विणकरांची धंदे बसले. विणकरांच्या पाठोपाठ रंगारी, तेली, चांभार, इत्यादी लोकांचे रोजगार बसले. जसजशी यंत्रातून निर्मिती होऊ लागली, तसतशी खेड्यातील या स्वयंरोजगार करणार्यांना झळ बसू लागली. हे सारेच व्यवसाय शेतीच्या आश्रयाने उभे राहणारे. त्यामुळे स्वाभाविकच पारंपरिक जीवनरचनेत संघर्ष सुरु झाला. यंत्रयुगाने ग्रामजीवनातील या स्वयंरोजगाराना जसे अस्वस्थ केले, त्याप्रमाणे शेतीलाही, आणि खेड्यातील बहुसंख्य समाज हा एक तर शेतावर जगणारा तरी होता किंवा शेतीच्या आश्रयाने जगणारा तरी होता. पण या साऱ्याच जीवनात प्रश्न निर्माण झाले. या साऱ्या तणावांचा, प्रश्नांचा पहिला उद्रेक झाला, तो म.फुले यांच्या



Scanned with CamScanner

लेखनातून. म. फुले यांची परंपरा पुढे जेधे, जवळकर, डॉ. आंबेडकर यांच्यापर्यंत चालत आलेली दिसते.

१९६० नंतर नाशिक जिल्ह्याचा विचार करता खेड्याचे स्वयंपूर्णत्व नष्ट होऊन त्याला शहराच्या मर्जी - गैरमर्जीवर अवलंबून राहावे लागले. दुसरी बाब म्हणजे, मिश्र अर्थव्यवस्थेचा आपण स्वीकार केलेला असला तरी मूलतः भांडवलशाहीचीच अर्थव्यवस्था आपल्या देशात प्रबळ आहे. या भांडवलदारी अर्थव्यवस्थेचे परिणाम भारतातील प्रत्येक गरीब समाजाला भोगावे लागत आहे.

औद्योगिक संस्कृती, नांगर भागाचे प्राबल्य आणि भांडवलदारी अर्थव्यवस्था या साऱ्या गोष्टींनी आजच्या ग्रामीण भागातले सारे प्रश्न निर्माण केले आहेत.

१९९० नंतरच्या काळात नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरात काय काय घडले त्याचा बारकाईने अभ्यास अनेक कवींनी वेगवेगळ्या अंगाने लिखाण करून ग्रामीण समाजाच्या व्यथा वेदना आपल्या कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. कवि विलास पगार, ऐश्वर्य पाटेकर, लक्ष्मण बारहाते, प्रकाश होळकर हे कवी ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करताना दिसून येतात.

कवी प्रकाश होळकर यांच्या 'कोरडे नक्षत्र' या कविता संग्रहातून ग्रामीण जीवनाचे एक वेगळे रूप आपल्या समोर येत असते. गेल्या काही वर्षांपासून ग्रामीण जीवनाचे वास्तव रूप बदलताना दिसतेय. पावसाअभावी नद्या नाले कोरडे होताहेत, शेतकऱ्यांसाठी ज्या विहिरीचा स्रोत आहे, तो आटताना दिसतोय. त्यामुळे जमिनीची ओल दिवसेंदिवस कमी कमी होताना दिसतेय, ग्रामीण भागात पूर्वी जी पक्षांची चिवचिव ऐकू येत होती, ती नामशेष झाली म्हणून पाण्याच्या शोधात पाखरे दूरदूर जात आहे. रानाला उन्हाच्या झळा शोधतात आणि पेरलेल्या दान्याला कोंब फुटण्याआधीच माती जाळून टाकते. अशा परिस्थतीत दुष्काळाचा नाग शेतकऱ्यांच्या समोर फणा काढून उभा राहतो आणि शिवारे जळत राहतात.

पाठीला पोट लावून कसेबसे जगणाऱ्या माणसांच्या काळजाखालचा अंधार तेवढा वाढत जातो. या ग्रामीण भागातील माणसांचे जीवनमान कठीण होत चाललेल्या जगण्याची असह्य वेदना कवी प्रकाश होळकर मांडण्याचा प्रयत्न करीत असतात. कारण त्यांची कविता शेतकऱ्यांच्या दुःखाशी जन्मनाळेने बांधलेली



Scanned with CamScanner

आहे. शेतकऱ्याच्या 'आतड्याचा पीठ, देहावर मातीचे फोड वागवीत जाणारा मातीचे वेड असलेला हा कवी, शेतकऱ्यांच्या जीवनाची दुःखे आणि स्वप्ने शेतीतून उगवून आलेल्या अस्सल भाषेतून व्यक्त करतो.

''भरूदे यंदा मृगाचं आभाळ,
नावाचा तुझ्या यळकोट करील '' -

ही काळजातून आलेली हाक आणि डोळ्यांदेखत शिवारचा करपा होत जातो. ही काळजाची कासावीस अशी थेटपणे व्यक्त करणारा हा कवी स्वतःचे व आपल्या गावाचे आत्मचरित्र कवितेतून मांडताना दिसून येतोय.

कवी विवेक उगलमुगले :- या संग्रहातील कवीच्या कविता अभ्यासल्या असता ते आपल्या गावाशी, गावाच्या माणसांशी व त्या गावातील मातीशी, गुरा ढोरांशी इतके एकजीव झालेले दिसतात की, त्या गावाची नाळ तुटता तुटत नाही, कवी गावाकडून शहराकडे आला तशी गावची शेतीही विकली. ते म्हणतात, 'माती नाही गेली आईच गेली' इतके दुःख ते व्यक्त करतात जमीन जेव्हा विकली गेली तेव्हा कवी त्या गावापासून दुरावला, गावाचे बंध जणू तुटायला लागले अशा अवस्थेत कवी शहरातल्या घरात राहून पाण्याविना माशाप्रमाणे त्यांच्या मनाची स्थिती निर्माण होते.

घनघोर पाऊस पडतो तसा मी रडतो,
माती नाही, आईच गेली इतकामी तडफडतो''.

अशी अवस्था ते आपल्या कवितेतून ते मांडतात.

कवीने स्वतःच जमीन गेल्याचे दुःख त्या तीव्र वेदना पचविताना त्यांना जे दुःख झाले ते त्यांच्या प्रत्येक कवितेतून आपणास दिसून येत असते. म्हणून शेवटची इच्छा ते व्यक्त करतात. 'एक शेवटची इच्छा, देह गावीच जाळा' इतके आपल्या मातीबद्दल, गावाबद्दल ते आपले प्रेम व्यक्त करताना दिसून येतात.

ऐश्वर्य पाटेकर - यांच्या 'भुईशास्त्र' या कविता संग्रहातील कविता संवादी, सात्विक आणि स्वाभाविकपणाची लक्षणे असणारी आणि संतांच्या परंपरेशी जोडलेली आहे. या संग्रहाची एकूण रचना कवी ऐश्वर्य पाटेकरने 'दृष्टांत पाठ', 'वृषभलीला', 'भुईशास्त्र', 'गर्भ ओवी आणि 'हुर्दुकटिपा' या विभागात केलेली


Scanned with CamScanner

आहे. या संग्रहाच्या प्रारंभीच्या कविता कष्टकरी शेतकरी वर्गाच्या सर्व प्रकारच्या अवस्था मांडलेल्या आहे. या कविता संग्रहातील कविता म्हणजे समाजाला समाजाविषयी लागलेली महाभयानक कीड. 'भुईशास्त्र' या कविता संग्रहात मांडण्याचा प्रयत्न करीत असतो.

विलास पगार - 'मायमाती' हा विलास पगार यांचा कविता संग्रहामध्ये अधिक प्रगल्भ आणि प्रौढ आहे. कल्पनाविलास स्वच्छादतावादी जीवनानुभूती येथे सभोवतालाशी, सामाजिकतेशी अनुबंधित होत वास्तववादी आहे. माय आणि माती या केंद्रवर्ती प्रतिमा या काव्यसंग्रहात आहेत. माय आणि माती हे मातृत्वदर्शक आदिमबंध आहेत. कृषी संस्कृतीत भवश्रद्धेचे केंद्र बनतात. 'माती माझी माय होते' या ओळीमध्ये माय, माती आणि गाय या तिन्ही प्रतिकांमध्ये संवादीपण येथे लक्षात येते. शेतकरी मी आणि वासरू यांचे जन्मस्थान आणि अंतिम आश्रयस्थान मातृत्व असते. शेतकऱ्यांची भूमिका घेताना हे कविमन म्हणूनच मातीचा उदघोष करते.

लक्ष्मण बारहाते - यांचा 'पांचबिघे' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. बालवयातच आई-वडिलांच्या मायेची सावली दुरावली, मागे राहिलेली वडिलोपार्जित 'पांचबिघे' शेती आणि व्यवहाराचे भकभकीत ऊन बहिणींनी अंगावर पांघरून घातले खेड्यात वावरताना तेथील शेतकरी कष्टकऱ्यांचे आयुष्य मनविषन्न करीत होते. सगळा शिणवटा झाडून हि मंडळी रात्री देवळात भजनात दंग होत. त्यांनी आळविलेल्या अभंगाचा एक-एक चरण त्यांच्या मनावर आघात करीत. त्यातील शब्द:शब्द त्यांना रात्रभर तळमळत ठेवी. या उघड्या बोडक्या भकास आयुष्यात पडणारे प्रत्येक पाऊल त्यांना ठेचाळत राहिले. त्यांनी हे सर्व दाहक अनुभव आपल्या पाच बिघेतून मांडण्याचा प्रयत्न केला. लक्ष्मण बारहाते यांची कविता शेतकऱ्यांचे दुःख मांडते तशी ग्रामीण जीवनात बदलत जाणाऱ्या गावाचेही दुःख वर्णन करते.

जमिनीला कोणी देऊ नये दोष
निस्तरावा रोष निसर्गाचा ''

कवी शेतकऱ्यांना विनंती करून सांगतात की, आपल्या काळ्या आईला कधीच दोष देऊ नका.

**समारोप :-**

अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण कवीच्या कवितेतील समाजदर्शन, शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना, निसर्गाची अनियमितता, ग्रामीण शेतीवरती मोठी संकटे निर्माण करताना सर्वच ग्रामीण कवींच्या कवितेतून दिसून आल्या.

**संदर्भ ग्रंथ :-**


१) ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य - डॉ. नागनाथ कोतापल्ले.

२) दिवाण्या आणि तोड्या - विवेक उगलमुगले.

३) 'मायमाती' - विलास पगार.

४) भुईशास्त्र - ऐश्वर्य पाटेकर.

५) पाच बिघे - लक्ष्मण बारहाते.


❋ ❋ ❋